# प्रकरण तिसरे

# 'गोफ' कादंबरीचे अंतरंग

# प्रकरण तिसरे

# 'गोफ' कादंबरीचे अंतरंग

काही महत्वाच्या लेखिकांमध्ये ज्यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे अशा लेखिका म्हणजे गौरी देशपांडे. गौरी देशपांडे यांचे अनुभवविश्व मोठे आहे. त्यांच्या साहित्यकृतीतून त्यांची आकलन क्षमता, वेचकता, वेधकता स्पष्ट होते. अनुभवाला चिंतनाची जोड दिल्यामुळे त्यांच्या साहित्यात त्यांचे परिपक्व व विचार कलात्म होऊन येतात. त्यांच्या कादंबरीतील स्त्रीही शिक्षित, नोकरी करणारी शिवाय परंपरेच्या म्हणजे हिंदू चालीरितीच्या चौकटीत न राहणारी आहे. विवाह संस्थेकडे भावनेने न बघता बुध्दिने बघणारी आहे. परदेशात वास्तव्य करणारी आहे. त्यांच्या परदेशी वास्तव्याचे पडसाद त्यांच्या साहित्यावर पडलेले जाणवतात.

त्यांच्या 'गोफ' या कादंबरीचा येथे विचार मांडावयाचा आहे. ही कादंबरी मौज प्रकाशनाने १९९९ च्या जून महिन्यात प्रकाशित केली आहे. त्यापूर्वी ती 'गोफ दुहेरी' या नावाने 'साधना' च्या दिवाळी अंकात १९९४ रोजी प्रकाशित झाली होती. त्यांच्या इतर कादंबरीप्रमाणे ही कादंबरी छोटेखानी आहे. कादंबरीचा तसा विस्तृत पट असतो. पण त्यांच्या जवळ जवळ सर्वच कादंबऱ्या लहानच आहेत. त्या पात्र प्रपंच ही फार मांडत नाहीत. 'गोफ' मध्येही त्यांनी 'स्त्री'लाच कादंबरीच्या केंद्रस्थानी ठेवली आहे. 'वसुमती' ही कादंबरीची नायिका आहे. 'मां' तिची सासू, या सासू-सुनेच्या आत्मनिवेदनातून त्यांनी कादंबरीचे कथानक गतिमान ठेवले आहे. ही कादंबरी नायिकाप्रधान आहे. नायिका वसुमती ही घरच्यांच्या विरोधाला न मानता आंतरजातीय विवाह करते. त्यामुळे माहेरच्यांचा रोष तिला कायमस्वरुपी सहन करावा लागतो. पती 'सुलक्षण' सिनेसृष्टीत नोकरी करणारा असतो. ती बेगडी दुनिया त्याने जवळून पाहिलेली असते. तेथे सारेच नकली, नाटकी. त्यामुळे तो वसुमती सारख्या वास्तव जीवन अंगिकारणाऱ्या स्त्रीची सहचारिणी म्हणून निवड करतो. ही नायिका सर्वसामान्य स्त्रीमधील नटवेपणा, रंगरंगोटी किंवा कपडेलत्ते यांना फारसे महत्व देणारी नसते. तरीही ती बेगडी झगमगीत दुनियेत काम करणाऱ्या व्यक्तीशी लग्न करते इथे थोडीशी विसंगती वाटते. पण असेही वाटते की तो या साऱ्यात राहून दूर होता. म्हणूनच तिला पटला असावा. तो व्यसनाधिन होतो. तिच्या ध्येयवादी, निश्चयी, हट्टी स्वभावाला तो कसलीच दाद देत नाही . वयस्कर विधवा आई, मुलगा व पत्नी मागे ठेवून राम म्हणतो. डोळ्यात येणाऱ्या आसवांना बाहेरचा रस्ता थोपवून हृदयाच्या दिशेने परतवत वसुमती ते स्वीकारते.

या कादंबरीतील संघर्ष दोन स्त्रियांमधील आहे. दोघीही विधवा. पिढीचे अंतरही फारसे नाही. पण सासूच्या लाडाने सुलक्षण गेला असा समज करुन घेतल्यामुळे ती त्याच्या मृत्यूनंतर सासूजवळ राहण्याचे टाळते. इकडे सासूच्याही मनात हाच किंतू असतो. इतकी हट्टी तसेच निश्चयी, बरीच हेकेखोर स्वभावाची असूनही तिने आपल्या मुलाला वाचवण्यात का यश मिळविले नाही ? तिच्या विषयी त्यांच्या मनात फार प्रेमाचे उमाळे नसले तरी अगदी तिरस्कार ही नसतो. आपला नातू, सून आपल्या घरी रहावेत ही मां ची प्रामाणिक इच्छा असते. त्यासाठी त्या प्रयत्नही करतात. आपला मानस बंधू भाऊंना मध्यस्थी करायला सांगून मां सून वसुमतीला आपल्या घरी राहण्यास राजी करतात. तिला तिच्या गुण-दोषांसकट स्वीकारतात. पूर्वीपेक्षा तिच्यावर मायाही करु लागतात.

वसुमतीही पती निधनानंतर हट्टाने माहेरी राहू लागते. पण माहेरच्या लोकांचे बदललेले स्वभाव तिला खटकतात. तिचा भाऊ भावजयच काय पण आईदेखील तिच्याशी परक्यासारखे वागते. नंतर तीही आपल्या सासरी येते. तिथे शेती, वावर, गडीमाणसे, गुरे जनावरे हा सारा पसारा स्वत: जातीने आपला म्हणून स्वीकारते. नोकरांविषयी तिच्या मनात कनिष्ठतेची किंवा गुलामीची भावना नसते. त्यांच्याविषयीही तिच्या मनात त्यांच्याकडे बघण्याची माणुसकीचीच दृष्टी असते. शिकलेली, मुंबई सारख्या मायावी नगरीत राहिलेली, सिनेमासारख्या झगमगी दुनियेचा जवळून परिचय झालेली ही नायिका त्यातच गुंतून न रहाता आलेल्या संकटांना सामोरी जाते व खेड्यातील जीवन जगू लागते. स्वत: शेतात काम करते. रात्र-रात्र जागून लेखन करते व चार पैशाचा हातभार लावते. हे करत असताना ती अगतिक होत नाही. लाचार हीन, दीन, दुबळी अबला होत नाही. तर स्त्री आहे पण प्रथम माणूस आहे. आलेल्या प्रसंगांना सामोरे जाता येणारे प्रत्येक आव्हान स्वीकारणारी आहे. पती सुलक्षणवर तिचे खूप प्रेम असते. त्याला येणारे मरण हे त्याने करुन घेतलेला आत्मनाश आहे. या समजुतीने ती त्याचा रागराग करते. पण खरे तर हे त्याच्यावरचे तिचे प्रेमच असते.

सुलक्षणचा मित्र जसपाल हा सिनेसृष्टीत मेकअपमन असतो.नायिका लग्न करणार असते. त्याच्याशी लग्न करण्यातही तिची अगतिकता किंवा कमकुवतपणा नसतो. तर दोघांचे विचार एकमेकांना पटलेले असतात. त्यामुळे दोघांनी परस्परांना मनाने स्वीकारलेली असते. एकूणच या नायिकेला शिक्षणासाठी किंवा आर्थिक परिस्थितीशी झुंज द्यावी लागत नाही.

गौरी देशपांडे यांच्या इतर नायिकांप्रमाणेच ही नायिका पण स्त्री-पुरुष संबंधांकडे धीटपणे बघताना दिसते. समाजापेक्षा स्वत:च्या मताशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करते. नायिका स्त्री सुलभ

हळवेपणा, लाजरेपणा पसंत करीत नाही. किंवा इतर चारचौघीसारखी छानछोकीत राहणे, नटणे, कपडे-लत्ते यांची हौस बाळगणारी नाही. उलट तिचे राहणीमान अत्यंत साधे असते. सुटसुटीत पुरुषी कपडे, जीन्स व टी शर्ट वापरते. भावनेपेक्षा बुध्दीनिष्ठता आहे. तिच्यातला ठळक वाटावा असा गुण म्हणजे सर्वांकडे माणुसकीच्या नात्याने बघते. कोणतेही काम करण्यात तिला कसलाच कमीपणा वाटत नाही.

वसुमतीच्या बोलण्यात व वागण्यात भेद नाही. शब्दानुसार तिची कृती असते. याचे उदाहरण म्हणजे त्यांच्याकडे शेतात कामाला असणारी अंजू, तिचा नवरा युवराज, अंजूला मूल होत नाही म्हणून तिला माहेरी पाठवतो. व दुसरी सोयरीक करतो. हे ऐकून वसुमतीसह सारेच हळहळ व्यक्त करतात. पण वसुमती फक्त हळहळ व्यक्त करुन गप्प बसत नाही तर तिला घेऊन येते व आपल्या घरात ठेवते. तेही कोणी गुलाम किवा नोकर म्हणून नाही तर बहीण म्हणून. इथे तिची कृती कळते. फक्त भावना उराशी कवटाळून रडत बसत नाही. हे करताना कोणावर उपकार केल्याचा ना भाव असतो ना फुका कुणावर दया केल्याचा आव! केवळ आपल्या विचारांशी प्रामाणिक असण्याची साक्ष असते एवढेच.

तशी ही नायिका काहीशी चिडखोर, स्पष्टवक्ती, हट्टी, मुक्त विचारसरणीची आहे. पण तिच्या या स्वभावाला अहंकाराचा दर्प नाही किंवा घमेंडीचा स्पर्श नाही. तिच्या स्पष्टोक्तीतही सरळपणा आहे व चिडखोरीतही आपलेपणा आहे. दोन वर्षात पती, आई व भाऊ यांचा मृत्यू तिला पचवावा लागतो. जाणाऱ्याच्या दु:खाने होणाऱ्या वेदना सहन करताना ती अस्तित्वाचे भान विसरत नाही. इथेही तिच्यातील धीटपणाचा प्रत्यय येतो.

एकूणच गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' कादंबरीचे कथानक मनाच्या गाभाऱ्याला थेट जाऊन भिडते. छोटीशी कादंबरी, पात्र संख्या तशी कमीच, सर्वांमध्ये सुसूत्रता आहे असे वाटते. कथानकाचा विषय इतरत्र भेटणारा वाटला तरी त्यातून स्पष्ट होणारा आशय निराळा, स्वतंत्र वाटतो. लेखिकेच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव नायिकेच्या व्यक्तिरेखेत प्रतिबिंबित झाल्याचे आढळून येते.

स्वत:चे निर्णय स्वत: घेणारी असली तरी इतरांचाही आपलेपणाने विचार करते. आनंदा तिचा मावसदीर. त्याच्यात व सुलक्षणमध्ये तिला काही अंशी साम्य दिसते. तो तिच्याशी लग्न करण्याचा विचार बोलून दाखवताच ती स्वत:च्या स्वार्थापायी त्याला होकार देत नाही. तर त्याला दोघांच्या वयातील अंतराची आठवण करुन देते. ती चाळीशी ओलांडलेली असते तर हा तिच्याहून दहा वर्षांनी लहान असतो. त्याच्यापुढे सर्व आयुष्य पडलेलं असताना हे लग्न करणे योग्य नाही असा प्रामाणिक विचार करते.

गौरी देशपांडे यांची 'गोफ' ही कादंबरी ही कादंबरीचा पट असूनही उगीचच पसरलेली दिसत नाही. त्यांच्या कथानकाविषयी विद्याधर दशपुत्रे (मुंबई) म्हणतात, "आवश्यक मजकूर सोडल्यास इतर फाफट पसाऱ्यास फारसा वाव नसतो. व्यक्तिचित्रण पुरेसे पण मोजकेच असते. शैलीचा फुलोरा नाही."[१]

**स्वभावदर्शन :-**

गौरी देशपांडे यांची 'गोफ' ही कादंबरी तशी छोटेखानी आहे. प्रत्येक पात्राच्या जीवनाची सुरवात व शेवट अगदी इत्यंभूत, सविस्तर सांगण्याचा पसारा त्यांनी मांडलेला नाही. थोडक्यात पण महत्वाचे वाटावे असाच काहीसा त्यांच्या कादंबरीचा आवाका आहे. ही कादंबरी लेखकमुखी नाही, पात्र मुखी आहे. मां व वसुमती या सासू-सुनेच्या आत्मनिवेदनातून त्यांनी कादंबरी प्रवाही ठेवली आहे. या कादंबरीत अगदी महत्वाची वाटावी अशी पात्रे दोनच मां व वसुमती. मग इतर पात्रे त्यांना त्यांच्या - त्यांच्या जीवन वाटेवर भेटतात व सहप्रवासी म्हणून आपली भूमिका पार पाडतात. अगदी 'मां' चा मुलगा तो वसुमतीचा नवरा म्हणजे सुलक्षण हा कादंबरीत वावरताना दिसत नाही. तर तो इतर कमी अधिक महत्वाच्या पात्राप्रमाणे अधूनमधून डोकावताना दिसतो. वसुमती व सुलक्षण यांचा मित्र जसपाल किंवा 'मां' नी लहानपणापासून सांभाळलेला आनंदा वसुमतीचा मुलगा आदित्य हे सर्व जण ओघा ओघानेच आपले अस्तित्व दर्शवतात.

**वसुमती -**

ही 'गोफ' या कादंबरीची नायिका आहे. शिकलेली, सुखवस्तु कुटुंबातील. सुलक्षण या सुंदर, उच्चशिक्षित श्रीमंत व्यक्तीशी आंतरजातीय विवाह करते. लहानपणापासूनच आईकडून प्रेमाऐवजी तिरस्कार सोसलेला. तिच्या जन्मानंतर वर्षाच्या आत वडील गेल्याने पितृछत्र हरवलेली व आईच्या तिरस्काराला बळी पडलेली. स्वभावाने काहीशी हट्टी, स्पष्टवक्ती, स्वत:च्या मताशी प्रामाणिक स्त्री आहे म्हणून स्त्री जन्माप्रमाणे अभागी किंवा अबलापण न स्वीकारता कणखर, परखड असे तिचे स्वभावदर्शन होते. तिच्या या स्वभावातून माणसांकडे बघण्याची तिची दृष्टी निर्मळ असल्याचे मात्र जाणवते. रंगरुपाने साधारण, स्त्री स्वभावाहून तशी बरीच दूर तशी बाह्य छानछोकी किंवा देह सजवण्याची हौस यापासूनही लांब अशी. मुंबईसारख्या ठिकाणी नोकरी करत असते. वेळ पडल्यावर आपल्या सासूच्या घरी ग्रामीण भागात शेत-शिवार, गुरे-जनावरे, गडी-माणसे यांना मनापासून आपले म्हणणारी अशी दुसरी भूमिका पार पाडताना तिचे निराळेच स्त्रीरुप दृष्टीस पडते. स्वभावात नम्रता कमी

असली तरी अहंकाराचा वारा नाही. काही प्रसंगावरुन नास्तिकतेकडे झुकल्याचे दिसते. नास्तिक असली तरी एखादे दिवशी 'मां' च्या सांगण्यावरुन देवाला नमस्कार करण्याचे वावडे न वाटणारी. शब्दात स्पष्टते बरोबर अल्प का होईना परखडपणा असला तरी त्यामागे कुणाचे मन मुद्दाम दुखवण्याचा इरादा नसतो. माणसांकडे बघण्याची दृष्टी निखळ पारदर्शक वाटते. अंत:करणात हेवा-दावा किंवा आपपर भाव नसतो. जो की आपण इतर चारचौघी स्त्रियांमध्ये अल्पांशाने का होईना बघतो. ही आई आहे म्हणून ती चुकीची असली तरी योग्यच किंवा ही सासू आहे म्हणून योग्य असली तरी तिचे चूकच असे हेतुपुरस्सर ती कोणा माथी चुका मारत नाही. नाही म्हणायला सुलक्षण गेल्यानंतर काही अंशी 'मां' ना जबाबदार धरते. मां नी त्याला लाडावले किंवा आवश्यक ती माया, प्रेम, दिले नसल्यामुळे त्याने आत्मनाश करुन घेतला असा समज करुन ती मां शी फटकून वागते. नंतर मात्र फार आढेवेढे न घेता भन्ते ची आज्ञा प्रमाण मानून 'मां' कडे रहायला येते. इथे तिची अगतिकता नव्हे, तर समजूतदारपणा दिसतो.

हृदयापासून थेट इतरांच्या हृदयापर्यंत भिडण्याचे सामर्थ्य तिच्या संवेदनशील मनात असल्याची प्रचिती येते. वावरातील गडी माणसांशी नोकर-मालक असे नाते न ठेवता लहान किंवा मोठ्या बहीण भावाचे नाते ठेवते. गरीब-श्रीमंत, कामगार-मालक, शिक्षित-अशिक्षित, शहरी-ग्रामीण असे भेदाभेद न मानता 'माणूस' म्हणून त्याजकडे बघण्याची तिच्या व्यक्तिमत्वात शक्ती असल्याचे जाणवते. त्याच दृष्टीने मग स्त्री व पुरुष हा ही भेद मानत नाही. स्त्री किंवा पुरुष दोघेही प्रथम 'माणूस' आहेत, तिथे वर्गवारी किंवा कुणा एकाचा वरचष्मा कशासाठी ? असा तिचा खडा सवाल आहे .

चाळीशीनंतर सुलक्षण व तिचाही मित्र जसपाल याचेशी लग्न करण्याचे ठरवते. अशी ही वसुमती 'गोफ ' मधली नायिका स्वत:चे वेगळेच अस्तित्व वाचक मनावर बिंबवते. सर्वत्र भेटणाऱ्या चारचौघी स्त्रियांपेक्षा निराळी. तिचे आचार-विचार निराळे, स्वत:चे, स्वतंत्र, स्वयंसिध्द ! समाजात विविध मतप्रवाह. त्या प्रत्येक प्रवाहाबरोबर वहाताना स्वत:चे अस्तित्व गमावून, कुजत, कुढत, रडत जीवन जगण्यापेक्षा आपले स्वत:चे आत्मभान, आत्मवृत्ती, आत्मनिश्चयाने जगणे पसंत करणारी. मन अपंग करुन शरीर सांभाळण्यापेक्षा मनाचाच बाणा कणखर ठेवणारी ही वसुमती वाचकांच्या मनावर स्वत:चे अस्तित्व दीर्घकाळ रेंगाळत ठेवते.

गौरी देशपांडे यांची ही नायिका वाचताना पदोपदी लेखिकेची आठवण करुन देते. जणू लेखिकेचे अंतरंग, स्वभाववैशिष्ट्ये, गुण-दोषांचे तुषार सिंचन वाचक मनावर करत असल्याचा भास होतो.

**मां –**

गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' कादंबरीतील दुसरी महत्वाची व्यक्तिरेखा 'मां'. ह्या नायिका वसुमती हिच्या सासू या नात्याने भूमिका रंगवणाऱ्या स्त्री आहेत. ही कादंबरी गौरीताईंनी 'मां' व वसुमती यांच्या मुखातून गुंफत तशीच उलगडत ठेवली आहे. मां ह्या सुखवस्तू कुटुंबातील अगदी लाडकी म्हणावी अशी कन्या. त्यामुळे पारखून – निरखून योग्य स्थळ भेटल्यावर त्यांचा विवाह केला जातो. पण त्यांच्या नशिबात पतीसमवेत संसार सुख उपभोगण्याचे भाग्य नसते. अगदी अल्पावधीत त्यांना वैधव्याच्या वणव्याला सामोरे जावे लागते. सासरची माणसे पाठ फिरवतात. डोळ्यात जमणारे अश्रू पापणीआड दडवून त्या खंबीरपणे उभ्या राहतात. परदेशात असणाऱ्या मुलासाठी त्यांना धीर सोडून चालणार नाही याची जाणीव होते. भारतीय परंपरेला न चुकणाऱ्या भाऊबंदकीच्या कचाट्यातून मां ही सुटत नाहीत. मुलाच्या भवितव्यासाठी त्यांना विधवापण, अबलापण सोडून आई म्हणून येणाऱ्या परिस्थितीशी दोन हात करावे लागतात.

मां तशा कमी शिकलेल्या पण विचारांना संस्काराची जोड असल्यामुळे उच्च विचारांच्या, जीवनाचा जोडीदार अर्ध्या वाटेवर सोडून गेला तरी नशिबाला दोष देत रडत जगण्यापेक्षा येणारा प्रत्येक क्षण हा आपल्यासाठी नवी आव्हाने घेऊन येणार आहे असे समजून त्याचा स्वीकार करतात.

मां स्वभावाने समजूतदार वाटतात. त्यात परिस्थितीने जबाबदारी पूर्ण एकटीवर टाकल्यामुळे अधिकच पक्वपणा आलेला असतो. मुलगा परक्या जातीच्या मुलीशी तेही त्यांना विचारात न घेता लग्न करतो. तरी त्रागा करुन घेत नाहीत. किंवा मुलाला व सुनेला दूषणे देत नाहीत. उलट ज्यावेळी वसुमती घरी येते तेव्हा तिचे आनंदाने स्वागत करतात. वैधव्याचे चटके सोसून एकटीने संसाराचा गाडा ओढून मुलाला मोठे करतात. मुलाने जीवनातील महत्वाचा निर्णय घेतला तेव्हा आईला विचारायला किंवा विश्वासात घ्यायला हवे होते. असे कोणतेच मत मांडताना किंवा खंत व्यक्त करतानाही दिसत नाहीत. मुलगा सुंदर, हुशार, शिकलेला, श्रीमंत सारे अनुकूल असताना साधारण रुप असणाऱ्या, जाती बाहेरच्या मुलीशी लग्न केल्यावरही त्या तटस्थच असतात. इथे मां ही व्यक्तिस्वातंत्र्य मांडतात असे वाटून जाते.

सुलक्षण गेल्यावर मात्र वसुमतीने त्याला वाचवायला हवे होते असे त्यांना वाटते. ती एवढी जिद्दी, निश्चयी असतानाही का बरे तिने माझ्या सुलक्षणला वाचवले नाही. हा त्यांचा प्रश्न तसा अचूकच असतो. पण तरीही त्या तिच्याशी दुरावून फटकून वागून नाते तोडून टाकत नाहीत. उलट वसुमती व नातू आदित्य यांनी आपल्याजवळ रहावे. हा सारा पसारा तिचा आहे. तिने तो सांभाळावा असे

त्यांचे प्रामाणिक मत असते. यावरुन त्यांच्यातील निर्लोभीपणा, योग्य वेळी अधिकार सुनेच्या ताब्यात देण्याची वृत्ती चांगुलपणाची, सभ्यतेची वाटते.

मां शेता-वावरावर, गुरा-जनावरावर जसे प्रेम करतात तसेच प्रेम त्यामध्ये राबणाऱ्या नोकर-माणसांवरही करतात. मुलगा कसाही असला तरी त्याचा रागराग करीत नाहीत. सून आहे तशी स्वीकारण्याचा मोठेपणा त्यांचे जवळ आहे. घरच्यांनाच काय पण परक्या लोकांनाही आपलेसे करुन घेण्याची, त्यांना आपले म्हणण्याची किमया त्यांच्या वृध्द काळजात चिरतरुण आहे असे वाटते. उदा. जसपाल किंवा भन्ते. तसेच अंजू ही तशी परकीच माणसे, पण त्यांच्यासाठीही त्यांच्या हृदयात जागा आहे.

'मां' च्या मनाचा मोठेपणा दिसतो तो आनंदच्या बाबतीत. आनंदा हा पोरका पोर. पण मां त्याला पोटाशी धरुन त्याचेवर पोटभर माया करतात. त्याला आईची माया व वडिलांचे कर्तव्य यापैकी कशाचीच उणीव भासून देत नाहीत. एका परक्या पोरक्या पोराचे यशस्वी जीवन घडवतात. येथेच त्यांच्या मनातील आभाळागत माया व सागराएवढी विशालता दिसते.

आपल्या मुलाच्या मृत्यूनंतर वसुमती व जसपाल यांच्या लग्नाला संमती देतात. इथेही त्या तिच्या स्वातंत्र्याला तडा जाऊ देत नाहीत. सुरवातीला त्यांचे वसुमतीवर खूप प्रेम नसले तरी तिच्याविषयी मनात रागालाही थारा देत नाहीत. तिचे राहणीमान, पुरुषी पोषाख घालण्याची सवय किंवा तिचे मद्यपान करणे तसेच तिचे नास्तिक असणे अशा काही गोष्टी 'मां'च्या स्वभावधर्माशी विसंगत असतात. पण 'मां' तिथेही तिला कुठे विरोध करताना दिसत नाहीत किंवा सून म्हणून इतर चारजणी सारखे रहा असे उपदेशाचे डोस ही देत नाहीत.

तिच्या त्यांच्यापेक्षा विरोधी असणाऱ्या आचारा-विचाराकडे कळत-नकळत दुर्लक्ष करतात. त्या पाठीवर टाकत, तिच्या इतर असणाऱ्या चांगल्या गुणांकडे डोळसपणे पाहताना दिसतात. 'मां' ही स्त्री जन्माने गांजलेल्या, पिचलेल्या, किंवा अगतिक झालेल्या दिसत नाहीत. लाचारपणे, दीनपणे कुणाकडे कशाचीच भीक मागताना दिसत नाही. उलट धाडसाने, खंबीरपणे पतीच्या इस्टेटीसाठी, लहान पोराला घेऊन लढताना दिसतात. नंतरही वैधव्य आले तरी अश्रूंचे प्रदर्शन मांडत नाहीत.

गौरीताईंच्या कादंबरीतील स्त्री पात्रांचे हेच ठळक वैशिष्ट्य असते. त्यांची नायिका कधी असहाय्यतेचे, अगतिकतेचे किंवा असमर्थतेचे स्वत:चे दर्शन इतरांना करून देत नाही. ती शिक्षित असते. स्वावलंबी असते. स्वत:विषयी आत्मभान आलेली असते आणि स्वत:च्या व इतरांच्याही

व्यक्तिस्वातंत्र्याला जपणारी असते. 'रात्रं दिन आम्हा युध्दाचे प्रसंग' म्हणत दोन हात करत लढत राहते. रडत नव्हे.

भाऊबंदकी, समाज, याच्या परंपरेने चालत आलेल्या जाचास स्त्रीला सामोरे जावे लागते. समाजाशी संघर्ष करावा लागतो. एकूणच गौरी देशपांडे यांनी चितारलेले मां चे दर्शन हे धीट, सबला, कुणाच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड न येणाऱ्या स्त्रीचे दर्शन आहे.

**आनंदा –**

'गौरी देशपांडे' यांच्या 'गोफ' कादंबरीतील हे व्यक्तिचित्र. लहानपणीच 'मां' च्या आश्रयाला आलेला आनंदा. 'मां' च्या दूरच्या बहिणीचा मुलगा. मां चा वरदहस्त मिळाल्यामुळे तसेच मां कडून मायेची ऊब व पित्याचे छत्र या दोन्ही गोष्टी मिळाल्यामुळे जीवनात यशस्वी झालेला. लहानपणीचा लाजरा, बुजरा, घाबरा आनंदा एक बडा पोलिस आधिकारी झालेला असतो. सत्ता–संपत्ती–सन्मान सारे मिळाले तरी 'मां' ना विसरत नाही. त्याच्या उपकाराची, प्रेमाशी कृतज्ञ राहतो हा त्याचा माणूसपणा.

मां च्या शेतात कामाला असणाऱ्या अंजूच्या बहिणीशी लग्न करण्याचे ठरवतो. ते शक्य होत नाही. या कारणाने दीर्घकाळ अविवाहित राहतो. तडफदार, हजरजबाबी पोलिस आधिका–याला शोभेल असे व्यक्तिमत्व गौरीताईंनी रेखाटले आहे. पुरुषी वरचढपणा मानणारा तो असतो. पुरुष, पुरुषांच्या जागी व स्त्री ही स्त्रीच्या ठिकाणी असते अशा विचारांचा तो असतो. याच कारणावरुन वसुमती व त्याचे थोडेसे मतभेद होतात. वसुमतीच्या आयुष्यात पुरुषपणाचा वेगळा हिसका दाखवणारा हा पहिलाच पुरुष असावा असे वाटण्या इतका तो वेगळा आहे.

**जसपाल –**

'गोफ' मधील नायिका वसुमती व तिचा नवरा सुलक्षण यांचा मित्र. सिनेक्षेत्रात मेकअपमनचे काम करत असतो. स्वभावाने समजुतदार, कोणासही लगेचच आपलेसे करणारा. सुलक्षण आजारी असतो म्हणजे अगदी शेवटच्या घटका मोजत असतो तेव्हा जसपाल प्रसंगावधान राखून 'मां' ना मुंबईला घेऊन जातो. त्याच्यामुळेच मां ची व सुलक्षणची शेवटी तरी भेट होते. खरं तर तेव्हा सुलक्षण मां ना आणण्यास विरोध करीत असतो. पण वेळ–काळाचे प्रसंगाचे भानही ठेवतो.

सुलक्षण नंतर मां ना मुलाची व आदित्याला पित्याची उणीव भासणार नाही याची काळजी घेतो. वसुमतीशी विवाह करण्यास तयार असतो. पण हे सर्व करत असताना कुठेही कोणावर उपकार केल्याचा अविर्भाव नसतो त्यांच्यामध्ये निर्व्याज्यता, निर्मळताच दिसून येते.

वसुमतीची मुंबईत फार कुतरओढ होते हे पहाताना तिच्याविषयी तो हळहळ व्यक्त करतो. पण आपले घरी रहायला चल असे म्हणत नाही. कारण वसुमतीच्या आत्मसन्मानाला ते पचणारे नाही हे तो जाणत असतो. तिच्यावर प्रेम असले तरी पुरूषी हक्क लादताना दिसत नाही. जेव्हा मां वसुमतीला त्यांच्याकडे घ्यायला येतात तेव्हा ती दूर जाणार म्हणून खेद करत न बसता तिच्या सुखाचा तिच्या मुलाच्या भवितव्याचा व साऱ्यांच्या एकोप्याचा विचार करतो. स्वतःच्या स्वार्थासाठी तिला तिथेच राहाण्याचा आग्रह करत नाहीच उलट तिने मां कडे जावे म्हणून मां ना मदत करतो.

जसपालच्या रुपाने एका आदर्श मित्राचे चित्र गौरीताई वाचक चक्षू समोर उभे करतात. मैत्रीचे नाते हे स्वीकारलेले असते. ते लादलेले किंवा जन्मनात्याने आलेले नसते. तेव्हा ते नाते स्वीकारताना, गुण–दोषासह स्वीकारणे निभावणे महत्वाचे असते हे त्या व्यक्तिचित्रणातून दिसते. सिनेसृष्टीसारख्या अवास्तव दुनियेत राहूनही प्रत्यक्ष जीवनात वास्तवतेशी जवळचे नाते जोपासणारा हा जसपाल दीर्घकाळ मनात स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवतो.

**'भन्ते'–**

गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' कादंबरीतील हे बहुतांशी महत्वाचे म्हणण्या इतके व्यक्तिचित्र. भन्ते व वसुमतीची यांची भेट झाल्यानंतरच कथानकाचा प्रवाह वेगळे वळण घेतो. 'भन्ते' ही परदेशी व्यक्ती पण जवळजवळ संपूर्ण भारतीय झालेली. वसुमतीच्या शब्दात सांगायचे म्हणजे ''फिकट निळ्या डोळ्यांची, सुरकुतलेल्या शुभ्र रंगाची किरकोळ आकाराची ती व्यक्ती म्हणजे एक इंग्रज विद्वान होते.'' अलिकडे त्यांना अंधत्व आले होते, पण मनाविचाराचे नेत्र मात्र चांगलेच डोळस दिसतात. वसुमतीची मैत्रीण 'कांता' ही भन्ते व वसुमती यांची भेट घालून देण्यास माध्यम ठरते. वसुमतीला मधल्या वेळेत काम करता येईल अशी नोकरी भन्तेकडे असते.

कळत न कळत वसुमतीच्या मनात त्यांचेविषयी आदर आपलेपणा निर्माण होतो. अगदी तिच्याही नकळत त्यांच्याही मनात तिचेविषयी स्नेह असतो.

वसुमती भन्तेंचा शब्द मोडत नाही इतके पक्के बंध त्यांच्यात निर्माण झाल्याचे दिसतात. वसुमती सारख्या स्वतंत्रमवादी स्त्री वरही भाऊंच्या विचाराची छाप पडावी, असे कर्तव्यदक्ष असतात. अशा निरामय जीवनापुढे वसुमती आपले विचारांचे ओझे हलके करते.

'मां' ना ते मला भाऊ म्हणा असे सांगून स्नेहाचे, जवळकीचे नाते लावून आपलेसे करतात. जसपालचेही स्वागत करतात. म्हणजे एकट्या वसुमतीला आपले म्हटल्यावर तिच्या भोवतीच्या साऱ्या लोकांनाही आपलेपणाने स्वीकारण्याचा मोठेपणा त्यांच्या स्वभावातून दिसतो.

कादंबरीत शेवटी ते गेल्याने वसुमती व 'मां' दोघींनाही खूप दु:ख होते. यावरुन एक परकी व्यक्ती अगदी देशानेही परकी असणारी व्यक्ती अंगभूत गुणाने, विचाराने, एखाद्याच्या कुटुंबाचे विखुरलेले धागे एकत्र करुन गोफ विणून देते व आपल्या जीवनाचा ठसा इतरांच्या मनावर कायमचा कोरुन ठेवते हे स्पष्ट होते. असे हे भन्ते त्यांच्या विद्वत्तेने, संस्कृत, पाली, अर्धमागधी अशा गत आणि हिंदी, मराठी, बंगालीसारख्या जित्या भाषांतराच्या ज्ञानाने स्वत:चा वेगळा व प्रभावी ठसा वसुमतीवर पाडतात. वसुमती त्यांच्या ज्ञानाने दिपून जाते.

**संघर्ष –**

कथा, कादंबरी किंवा नाटक कोणताही वाङ्मय प्रकार घेतला तरी संघर्ष हा त्याचा प्राण असतो. साहित्य हे कल्पनेच्या मनोऱ्यावर उभे राहिलेले असले तरी त्याचा पाया हा समाज जीवनातील वास्तवाशी इमान राखणारा असतो.

माणूस मग तो कसाही, कुठेही असो, संघर्ष हा त्याच्या जीवनाचा अविभाज्य घटक असतो. जीवन जगत असताना अनेकवेळा अनेक रसांची निर्मिती, उत्पत्ती–लय यांचा प्रवासही त्या जीवनधारेबरोबर सुरु असतोच. अगदी त्यातलाच आणखी एक रस म्हणजे संघर्ष. इतका घनिष्ट संबंध असतो मानवी जीवनाचा व संघर्षाचा.

कथानक कशाचेही असले तरी संघर्षाशिवाय त्यास गती येत नाही. संघर्षातील चढउतारच जणू त्या कथानकाला दोलायमान ठेवत असते. संघर्ष अनेकविध रुपाने प्रत्येकाशी नाते जोडतच असतो. व्यक्ती–व्यक्ती, व्यक्ती–समाज किंवा अशा अनेक प्रकारे प्रत्येकाला कशासाठी तरी, कोणाशी तरी संघर्ष करावाच लागतो. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक अशा अनेक प्रकारचा संघर्ष जीवनात दिसतो. एवढे संघर्षाचे प्रखर रुप बघितले की वाटते, संघर्ष करावा लागला नसता तर कदाचित मानवी जीवन अर्थहीन झाले असते.

संघर्ष जीवनात येतो तेव्हा मानवाची ती खरी परीक्षा किंवा कसोटी असते. तिथेच त्याच्या जीवनाचा प्रवाह, गती, दिशा ठरत असते. काळ आपल्या गतीने चालत असतो. पण आपल्याला प्रत्येक दिवस वेगळा असतो. खुपदा ते उमगत नाही एवढेच. या नव्या दिवसातील अनेक दिवसांवर संघर्षाने

आपले नाव गोंदलेले असते. एकूण काय कधी पावसाच्या धारांनी चिंब होत तर कधी उन्हांच्या झळांनी तापत, तावत, कधी थंडीने गोठत, गारठत जीवनाचा प्रत्येक क्षण आपण स्वीकारत, झेलत, पचवत, पेलत असतो इतकेच !

'गौरी देशपांडे' यांच्या 'गोफ' या लहानशा कादंबरीत ही संघर्ष आहेच. त्यांच्या कादंबरीतील नायिका इतर चार जणींसारखी नाही. इथला संघर्षही तसा निराळाच वाटतो. अनेकांच्या जीवनात दारिद्रयामुळे संघर्ष करावा लागतो. पण ही नायिका सुखवस्तू घरातील आहे. तिलाही काही काळ पैशाच्या तडजोडीसाठी जीवाची ओढाताण करुन नोकरी करावी लागते. पण ते फार मोठा संघर्ष वगैरेत मोडणारे वाटत नाही काही ठिकाणी पतीपत्नीच्या नात्यातही परस्पर विरोधी स्वभावामुळे संघर्षमय वातावरण निर्माण होते. इथे तसेही चित्र दिसत नाही.

'गोफ' मध्ये सासू व सून यांच्यामध्ये संघर्ष उद्‌भवला आहे. कादंबरी तेथून गती घेते असे दिसते. वसुमतीचा पती सुलक्षणच्या आत्मघात म्हणावा अशा मृत्यूला मां म्हणजे सुलक्षणची आई जबाबदार आहे. असा समज करुन घेतल्यामुळे दोघीत संघर्ष निर्माण झाला आहे. वसुमतीच्या स्वभावातील जिद्द किंवा हेकेखोरपणा पाहून 'मां' ना ही वाटते, या गुणाच्या बळावर वसुमतीने सुलक्षणला का वाचवले नाही ? दोघीही आपल्या आपल्या ठिकाणी बरोबर वाटतात. सुलक्षण हा 'मां' चा लाडका मुलगा, त्या विधवा तेव्हा त्यांनी त्याच्यावर ममतेची उधळण केली असली, तरी त्याच्यातील दोषांवर पांघरुण घातले असावे असा समज वसुमती करुन घेते. आईची माया डोळस हवी ती अंध नको अन्यथा गांधारीच्या पुत्रांसारखी गत होते. त्याला हव्या असलेल्या गोष्टींची पूर्तता करण्यास मां असमर्थ ठरल्या असाव्यात असे वसुमती म्हणते कारण तो सतत काहीतरी शोधत आहे, त्याच्या जीवनात कशाची तरी उणीव असल्याची जाणीव वसुमतीला झाली होती. वसुमती भेटल्यावर त्याची शोधमोहीम संपली असा तिचा पक्का समज झाल्यामुळे ती मां विषयी नाराजीचे सूर काढते. वसुमती मां जवळ रहात नाही. एवढेच नव्हे तर आपल्या मुलाला आदित्यलाही मां पासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करते.

हा या कादंबरीतील दिशा दर्शवणारा संघर्ष असला तरी नायिकेला तिच्या जन्मापासूनच अनेकवेळा संघर्षाचे स्वागत करावे लागले आहे असे दिसते. तिच्या जन्मानंतर वर्षाच्या आत वडील वारल्यामुळे आईची तिच्याकडे बघण्याची दृष्टी बदलते. प्रत्यक्ष आईची नफरत स्वीकारत तिच्या जीवनाचा प्रवास सुरु होतो. नंतर जाती बाहेर विवाह केला म्हणून माहेरच्यांना दुरावते. वैधव्य आल्यानंतर सासूशी तेढ निर्माण होते. म्हणजे आयुष्याच्या वाटेवर येणाऱ्या प्रसंगांना धीराने धीटपणे

सामोरे जाणारी ही नायिका आहे . या कादंबरीत सासूशी असणारा संघर्ष हा नात्याच्या बांधिलकीतून आलेला दिसतो. पारंपारिक सासू–सुनेच्या संघर्षाहून वेगळ्या स्वरुपाचा संघर्ष आहे. या संघर्षाचे स्वरूप परिस्थितीजन्य असे आहे. पती व मुलगा या भूमिकेत असणारा सुलक्षण याच्या मृत्यूने वसुमती व मां यांच्या मनात ओढवणारी तेढ दोघींमध्ये पडलेला पीळ हे संघर्षाचे कारण आहे. सुलक्षणच्या मृत्यूने निर्माण झालेली परिस्थिती दोघींच्या सासू–सुन नात्यात तेढ निर्माण करते. असे यातील संघर्षाचे स्वरूप आहे.

गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' मधील नायिकेचा संघर्ष जसा सासूशी आहे तसाच तो स्वत:च्या मनाशीही आहे. सुलक्षणने आपल्याला नकळत धोका दिला, असे तिचे एक मन म्हणत असताना तिचे दुसरे मन ही त्याविरुध्द उभे राहते. ती स्वत:चे आत्मपरीक्षण करु लागते. मी लग्न केले तेव्हा लहान, अज्ञान नव्हते. शिकलेली, सज्ञान होते. स्वत:च्या विवाहाचा निर्णय स्वत:च घेतलेला होता. मग मी फसले गेले कशी ? असाही विचार करते यावरुन तिचा मन:संघर्ष दिसतो. दुसऱ्या व्यक्तीशी किंवा समाजाशी कराव्या लागणाऱ्या संघर्षापेक्षा व्यक्तीने स्वत:च्या मनाशी केलेला संघर्ष हा उच्चश्रेणीचा मानला जातो. ही नायिका स्वमनाशी संघर्ष करते वेळी चिंतनशील, विचारी वाटते.

**भाषाशैली –**

कोणत्याही वाङ्मय प्रकारामध्ये भाषाशैलीला असाधारण महत्व असते. प्रत्येकाची भाषाशैली त्याचे स्वतंत्र अस्तित्व दर्शविणारी असते. नाटक या वाङ्मय प्रकारात भाषा अधिक लवचिक, मोजक्या शब्दात मोठा आशय सांगणारी व अलंकृत संवादाने नटलेली असल्यास प्रभावी ठरते. तिथे भाषेचा पाल्हाळपणा किंवा शब्दांची उधळण न परवडणारी असते.

काव्याची भाषा गेयतेकडे झुकलेली, सूचकतेतून साकारणारी, शब्दांची वळणे घेत प्रगटणारी, मर्यादित शब्दातून बराच व अचूक आशय सांगणारी असावी लागते.

त्यामानाने कादंबरीची भाषा मात्र साधी, सरळ, सोपी कमी नटली–सजलेली असल्यास हरकत नसते. कादंबरीचा पटही तसा विस्तारित असतो. त्यामुळे भाषेचा परीघ जरा रुंदावला तरी चालतो.

तरीही भाषेत, त्या त्या व्यक्तीच्या स्वभावधर्माला व प्रसंगाला अनुरूप अशी भाषा वाचक मनाचा वेध घेते. अशिक्षित असणाऱ्या पात्र मुखातून अलंकारिक भाषा वदवली तर चालणार नाही व एखादे सभ्य पात्र पाचकळ, असभ्य बोलले तर वाचक मनाला खटकल्याशिवाय राहणार नाही. व्यक्तीच्या स्वभावाला शोभेल अशीच भाषा वापरली असेल तरच त्या साहित्यिकाचे कौशल्य असते.

भाषा ही संवादातून प्रगट होत असते. त्यामध्ये सफाईदारपणा, योग्यायोग्यता, सूचकता, सहजता हे गुण असले पाहिजेत. फार बोजड किंवा अति अलंकृत भाषा रसभंगाला कारण ठरु शकते, हे सत्य नाकारता येत नाही.

'गौरी देशपांडे' यांची भाषाशैली ही सोपी, सहजता प्राप्त केलेली वाटते. बोजड किंवा क्लिष्ट शब्दांनी रंगलेली दिसत नाही. शिवाय फार अलंकार परिधान करुन कारणापेक्षा जास्त नटलेलीही नाही. त्यांची भाषा ही ग्रामीण किंवा खेडवळ नाही. गौरीताईंची 'गोफ' ही कादंबरी अभ्यासताना दिसते की, ही कादंबरी उच्च मध्यवर्गीय लोकांच्याशी जवळचे नाते सांगणारी आहे. दारिद्र्याने गांजलेल्या लोकांची दीनवाणी किंवा पीडेने त्रागा करणारी तिरस्करणीय अशी भाषा नाही. ग्रामीण भागातील अशिक्षित कुटुंबातील भाषा नाही. या कादंबरीतील नायिका, शिक्षित नोकरी करणारी शिवाय साहित्याची जाण असणारी, स्वत: साहित्य निर्मिती करणारी अशी आहे. तिचे कुटुंबही शिक्षित उच्चभ्रू आहे. परदेश दौरे करणारी, परदेशी लोकांशी परिचय असणारी ही माणसे त्यांना साजेसे असे संवाद साधतात. त्यामुळे त्यांची भाषा ही नागरी भाषा आहे.

अधूनमधून शेत–वावरात काम करणाऱ्या व्यक्तीच्या मुखातून एखाद दुसरा संवाद त्यांना शोभेल असा ग्रामीण भाषेत आलेला आहे. उदा. अंजनाचा सासरा अबू म्हणतो,''कोण भेटलं तुमाला तर काय धन दौलत इचारतो ? मुलबाळ काय असेच म्हन्तो ना ? पोराबाळासाठी तर अपून कष्ट करतो ना ?'' पण ती शब्दांची संवादाची फेक अचूक करतात. काही वेळा इंग्रजी वाक्ये, एखाद दुसरा इंग्रजी शब्द ही भाषेतून व्यक्त झालेला दिसतो. पण त्यामुळे कुठेही विसंगती किंवा रस हानी झाल्याचे जाणवत नाही. ती पात्रे परदेशी व्यक्ती बरोबर वावरणारी आहेत. तेव्हा इंग्रजी शब्दांचा वापर आपसुकच होतो. त्यात खटकण्यासारखे वाटत नाही.

'मां' सासू आहेत. त्या भूमिकेतील त्यांच्या भाषेत आदरा बरोबर फार तर अधिकार दिसतो. पण उगी सासूचा हक्क लादण्याचा परखेडपणा कुठेही दिसत नाही. तसेच वसुमतीही स्वतंत्र विचाराची, स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व दाखवणारी सून असली तरी सासूला कमी, तुच्छ लेखणारी भाषा वापरत नाहीत.

या कादंबरीतील प्रत्येक पात्र स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व सिध्द करणारे आहे. इतरांचे व्यक्तिस्वातंत्र्य जपणारे आहे. मां व वसुमती आपआपल्या मनोगतातून , आत्मनिवेदनातून कादंबरीची निरगाठ उकलत आहेत असे दिसते. दोघींच्या मनोगतातून कादंबरी प्रवास करते. त्यामध्ये एकप्रकारची सुसंगती दिसते. कुठेही विस्कळीतपणा दिसत नाही.

भन्ते परदेशी पण भारतीय धर्म स्वीकारलेले विद्वान आहेत. त्यांच्या भाषेत सहजता आहे. कुठेही कृत्रिमता डोकावत नाही. जसपाल सिनेसृष्टीत मेकअपमनचे काम करत असतो. त्याच्या भाषेत त्याच्या व्यवसायातील बेगडीपणा चुकूनही आलेला दिसत नाही. त्याची भाषा ही वास्तवाचे, स्वत:च्या सरळ, निरामय स्वभावाशी इमान राखते. आनंदा पोलिस अधिकारी आहे त्याच्या स्वभावात पुरुषी वर्चस्वाचा दर्प आहे. त्याला साजेशीच भाषा त्याच्या मुखातून गौरीताई वदवताना दिसतात.

गौरी देशपांडे या स्वत: एका सुखवस्तू कुटुंबात जन्मल्या, वाढल्या. उच्चशिक्षित समाजात वावरल्या, अनेक वेळा परदेशी गेल्या. त्यामुळे त्यांची भाषाही तशीच आहे. या भाषेत इंग्रजी शब्दाचा वापर येणे साहजिक आहे. त्यांची भाषा धिटाई दाखवते, दुबळी, अगतिकतेचे दर्शन घडवत नाही. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पडसाद त्यांच्या कादंबरीतील भाषेत उमटल्याचा प्रत्यय येतो.

त्यांना निसर्गातील सौंदर्य टिपण्याची दृष्टी आहे असे जाणवते. शेत-वावर, वनस्पती, पिके, त्या ओघाने आलेले पशु-पक्षी त्यांनी जवळून पाहिल्यामुळे व निरीक्षण शक्तीचे लेणे लाभल्यामुळे त्यांनी ते शब्दातून मुक्त उधळवले आहे. त्यांच्या शब्दशैलीतून व्यक्तीचे अंतर्बाह्य स्वच्छ दर्शन घडते. प्रसंग हुबेहुब डोळ्यासमोर उभे राहतात. निसर्गातले रमणीय वातावरण मनाचा ठाव घेतात हेच त्यांच्या लेखणीचे वैशिष्ठ्य आहे. कादंबरीतील पात्रे निवेदन करतेवेळी, त्यांच्या संवादातून प्रकटणारी भाषा इतकी ओघवती आहे की ते पात्र आपल्याशी हितगुज करते आहे, मनमोकळ्या गप्पा मारते आहे असा भास होतो व आपणही त्यांच्या सुखदु:खामध्ये, गप्पामध्ये बुडून जातो.

गौरीताईंची वाक्य रचना काही वेळा अगदी लहान वाक्यात थांबते. तर काही वेळा खूप लांबच लांब अगदी चार-पाच ओळींचा प्रवासही सहज पेलते. उदा. ''आज नको भाभी. या धावपळीत आणखी तमाशा. उद्या सांगीन.'' अशी लहान लहान वाक्य रचना अचूक योग्यायोग्य सरळपणाचे प्रतीक वाटते. मनावर परिणाम करते. तर काही वेळा ''एकेक करुन घरकाम उरकताना, घराच्या मांडणी-सजावटीत बदल करुन सुलक्षणच्या खुणा पुसून टाकायचा प्रयत्न करताना , झोपेची वाट बघत रात्र, रात्र त्या मोठ्या , रिकाम्या बिछान्यावर पडले असताना म्हणत राहिले, ''स्वत:च्या हातांनं स्वत:चा विनाश करावा इतका तुला स्वत:चा तिटकारा का आला सुलक्षण ?'' पण या प्रश्नाचे उत्तर मला सापडण्यासारखे नव्हते.'' असे मोठ्या वाक्याचा प्रपंच मांडताना ही त्यांची लेखणी सहजता ढळू दे त नाही.

गौरी देशपांडे यांची भाषा अगदी सहज, सोपी आहे. त्यांच्या अंतरंगातून निघाली असल्याने वाचकाच्या हृदयापर्यंत जाऊन भिडते. त्यांनी अलंकाराची अतिशयोक्ती कुठेही केलेली नाही.

वाङ्मयाच्या भाषेचा वेगळेपणा म्हणून त्यांच्या शैलीत काही वेळा जोडून येणारे शब्द मनावर रेंगाळतात. उदा. ''जळमटे-किट-पुटे'' किंवा कुत्र्या-मांजरां-गुरांवर इ. शब्दप्रयोगातून त्यांच्या लेखणीचे स्वतंत्र अस्तित्व सिध्द होते.

त्यांनी रुपक किंवा उपमा अलंकाराचा आवश्यक ठिकाणी वापर केल्यामुळे प्रसंगाला उठावदारपणा लाभला आहे. मां सुलक्षणसाठी खिन्न होतात. त्याच्या अकाली जाण्याची खंत व्यक्त करतात. तेव्हा तो प्रसंग मांडताना, ''चांदीच्या ताटात सगळं सुग्रास अन्न वाढून पुढं आलेलं, कां लाथाडलंस बाबा ?'' या शब्दात मां च्या मुखातून त्यांनी प्रसंगाला उठाव आणला आहे.

त्यानंतर वसुमतीच्या मनातून सुलक्षण उतरलेला असतो. तिच्यामते तो इतका शिकलेला , सुंदर, श्रीमंत काही कमी नव्हते. तरी तो जीवनाकडे उदासपणे का बघतो आहे ? वरुन तो चांगला दिसत असला, तरी आतून कमकुवत झालेला पोखरलेला आहे. या प्रसंगी वसुमती म्हणते, ''त्याची तुलना मी शनिवारवाड्याशी करत असे. बाहेरुन भले बुरुज आणि तटबंद्या आणि कुणावरही छाप पडेल असे रुप. आतमध्ये भग्न अवशेष आणि रिकामे औदासीन्य, गतेतिहासाच्या शब्द जड बखरी आणि गत पराक्रमाच्या फोल खुणा.''असे रुपक योजून त्या वसुमतीच्या मनातील विचारांना उठावदारपणा आणतात.

गौरी देशपांडे यांच्या सहज, सोप्या, सरळ भाषेतून ही कादंबरी आकार घेते. वाचक मनावर आपला स्वतंत्र असा ठसा दिर्घकाळ रेंगाळत ठेवते. काही प्रसंगाबाबत, व्यक्तिचित्रांबाबत विचार करायला लावते. हेच त्यांच्या भाषाशैलीचे यश आहे .

त्यांच्या भाषाशैली विषयी 'विजया राजाध्यक्ष' म्हणतात, ''गौरीच्या भाषेलाही एक खास वळण आहे. इंग्रजी भाषेचा अवलंब टाळलेला नाही. पण या भाषेची वळणे मराठीत अतिशय सहजपणे सामावून घेतली आहेत. अस्सल मराठी, विशेषत: स्त्रीच्या तोंडी असणारे शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांच्यामुळे शैली वेगवेगळे रंग धारण करते.''[२] यावरुन त्यांच्या भाषाशैलीची आपल्याला प्रचिती येते.

**स्त्रीवाद –**

'स्त्रीवाद' ही संकल्पना अगदी अलिकडच्या म्हणजे १९६० नंतरच्या साहित्यात आधिक्याने आलेली दिसते. त्यापैकी 'अश्विनी धोंगडे' यांचे नाव ठळकपणे समोर येते. 'स्त्रीवादी समीक्षा', 'स्वरूप आणि उपयोजन' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी ही संकल्पना योग्य पद्धतीने स्पष्ट केली आहे .

कुटुंब हे स्त्री व पुरूष या दोघांनी मिळून बनते. कोणा एकाला ते शक्य नसते. त्या संबंधाने तेथे दोघांना समान स्थान असणे आवश्यक आहे. स्त्री वाद जोपासणे म्हणजे कुटुंबाची चौकट मोडून बाहेर

पडणे असा अर्थ नव्हे. तर कुटुंब, पती, मुले सारे सांभाळताना स्वत:च्याही कलागुणांना वाव देणे. कुटुंबाच्या बाहेरचे विस्तारलेले जग बघून त्यात आपले स्थान, कुवत ओळखून तिकडेही लक्ष देणे असे म्हटले आहे. कुटुंब सोडून फक्त स्वत:चे करिअर करणे असेही नव्हे किंवा स्वत:चे मन विचार यांना पूर्ण झाकून किंवा बुध्दिवर पांघरुण घालून फक्त चूल व मूल येवढेच जीवन ध्येय समजणे हेही बरोबर नाही. अशाच प्रकारचे विचार अश्विनी धोंगडे यांनी मांडले आहेत.

पशूप्रमाणे फक्त शरीर जिवंत ठेवणे म्हणजे मानवी जीवन म्हणता येणार नाही. माणूस असा एकच प्राणी आहे की, तो अन्न वस्त्र निवारा व मैथून याशिवाय मन, बुध्दी, अहं, विचार या शक्तीनें जीवनाचा विकास करु शकतो. स्वत:ची ओळख करुन घेऊन मी माणूस आहे, माणसाप्रमाणे मनाचा विचार करुन मी माझ्या अंतरीची हाक ऐकून बुध्दिचा विकास करु शकते. कारण मी माणूस आहे. ही जाणीव म्हणजे स्त्रीवाद.

स्त्रीने कुटुंबासाठी खर्चलेला वेळ, केलेला त्याग, तिचे ते काम हे कमी दर्जाचे समजून तिला दुय्यमत्वाचा दर्जा दिला गेला. ती अर्थप्राप्ती करत नसल्यामुळे तिच्या कामांना अर्थ नाही म्हणजे ते कमी लेखले गेले. आजही काही स्त्रिया घर सांभाळत संसाराला हातभार लावण्यासाठी कुठेतरी चार पैसे मिळवण्याची धडपड करतात. ते काम कुटूंबासाठीच असते. तिने तिच्यातील सुप्त गुण ओळखून त्या कला-गुणांना वाव मिळेल, न्याय मिळेल, ते गुण वर्धन होतील तसे शिक्षण घेऊन आपल्या विकासाची कक्षा रुंदावली तर तिचे माणूस म्हणून एक जबाबदार घटक म्हणून समाजात तिचे स्थान निर्माण होईल.

म्हणूनच अश्विनी धोंगडे म्हणतात, ''स्त्रीने घरापुरती आपली क्षमता खर्च केली, ही 'स्व' ची आत्महत्या आहे.''[३] म्हणजे फक्त कमावती होणं पण त्या पैशावर आपला अधिकार नसणं हा स्त्रीवाद नव्हे, तर स्वत:चे माणूस म्हणून कुटुंबात, समाजात स्थान निर्माण करणं याला स्त्रीवाद म्हणता येईल.

'स्त्रीवाद' ही संकल्पना स्पष्ट करणाऱ्या दुसऱ्या एक विचारवंत म्हणजे डॉ. मंगला वरखेडे. त्यांनी आपल्या 'स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन' या ग्रंथात मांडले आहेत. त्या म्हणतात , ''स्त्रीवादाची चळवळ भारतापूर्वी बरेच वर्षे अगोदर परदेशात सुरु झाली. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये ही मागणी प्रथम १८६७ मध्ये 'जॉन स्टुअर्ट मिल' यांनी ब्रिटीश पार्लमेंटमध्ये केली.''[४] पुढे काही वर्षानंतर १९४५ मध्ये फ्रेंच स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला.

मराठी साहित्यात व समाजात स्त्रीवादाची संकल्पना मांडताना स्त्रीवादाविषयीच्या गैरसमजाची जळमटे दूर करुन मानवी स्वातंत्र्याविषयीच्या विचारांची मांडणी अनेक विचारवंतांनी केली. भारतात स्त्री

वादाच्या मागणीला प्रथम प्रारंभ केला तो 'ताराबाई शिंदे' यांनी. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात 'स्त्री पुरुष तुलना' (१८८२) हा निबंध लिहून त्यांनी या संकल्पनेचा पाया घातला. नंतर १८८२ मध्ये 'पंडिता रमाबाई' यांनी 'आर्य महिला समाज' ही पहिली स्त्रियांची संघटना स्थापन केली. या स्त्रियांनी स्त्रीवादी संकल्पनेचे बीजारोपण केले व तेव्हापासून अंकुरलेला वृक्ष अनेकांनी बहरत ठेवला.

स्त्रीवाद म्हणजे काय ? किंवा स्त्रीवादी संकल्पना समजून घेतल्यावर गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' या कादंबरीतील स्त्रीवाद समजून घेणे आवश्यक आहे.

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील नायिका ही स्त्रीवादाची जवळचे नाते सांगणारी आहे. गौरी ताईच्या जवळजवळ सर्वच कादंबऱ्या स्त्रीवादाचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. त्यांच्या जन्मापासून त्यांच्या घरात स्त्रीकडे माणूस म्हणून बघण्याची परंपरा जोपासली जात असल्यामुळे त्यांच्या तनामनात ते विचारप्रवाह वाहणे शक्यच आहे. त्यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर प्रकर्षाने जाणवतो. साहजिकच त्यांची नायिका ही उच्चशिक्षित आहे. साहित्य क्षेतात पदार्पण केलेली आहे. स्वत:च्या मताशी प्रामाणिक राहून स्वत:चा जोडीदार निवडणारी आहे. तो गेल्यावरही हृदयातील दु:ख अश्रू रुपाने फक्त ओघळत राहून अगतिक होऊन जात नाही. मी माणूस आहे, आलेल्या संकटांना, प्रसंगांना धीराने सामोरे जाणे हा माझा धर्म आहे. याची जाण आलेली आहे. त्यामुळे दीनपणे, लाचारीने कोणापुढे हात न पसरता स्वत:चे व आपल्या मुलाचे जीवन व्यवस्थित पार पाडण्यास समर्थ असते. स्त्री आहे म्हणून कोणताच दुबळा, हळवा भाव जसा कुणापुढे मांडत नाही. तसेच स्त्री आहे म्हणून स्त्रीत्वाचे प्रदर्शन मांडून कसला फायदाही करुन घेत नाही. आणि हेच तिचे स्त्रीवादी लक्षण दिसते.

पत्नी वारल्यानंतर पतीला घर, मुले सांभाळण्यासाठी जशी स्त्रीची गरज पडते, त्याच्याही पुढे जाऊन कुटुंबाची पूर्तता ही दोघे असण्यातच पूर्ण होत असते. हे समजून तो दुसरे लग्न करतो. कारण त्याला स्त्री शिवाय आपले जीवन, कुटुंब अपुरे वाटते. जीवनात अनेकवेळा, अनेक ठिकाणी, अपुरेपणाची उणीव भासत असते. हे समाजाला दिसते. त्यामुळे समाज त्याच्या दुसऱ्या लग्नाला मान्यता देतो. पण हेच जर स्त्रीबाबतीत घडले, तर तिने मात्र सारा भार, सारे दु:ख एकटीने सोसले तरी समाजाला त्याचे घेणे देणे नसते. आपले कुटुंब, मुले, स्वत:ला सांभाळताना मग तिला अगतिक व्हावे लागते. स्वत:च्या असहाय्यतेचे दुबळे प्रदर्शनही भरवावे लागते किंवा लाचारी स्वीकारत रोज मरत, रडत, मन मारुन, विचार बंदिस्त करुन मरता येत नाही. म्हणून शरीर सांभाळावे लागते. हा सवता सुभा समाजाला चालतो नव्हे असेच त्याला मान्य असते.

स्त्रीवादाची संकल्पना केवळ समाजापुरती किंवा साहित्यापुरती मर्यादित नाही. मानव समाजातील सर्व क्षेत्रात स्त्रीवाद अभिप्रेत आहे. त्याला चळवळीचे सामुहिक सामर्थ्य आहे. म्हणूनच १९७५ मधील जागतिक महिला दिनानंतर या चळवळीने व्यापक व गतिमान स्वरुप धारण केले.

पण गौरीताईंच्या गोफ मधील स्त्री पती सुलक्षण गेला तरी अगदी चाळीशी ओलांडली असली तरी दुसरे लग्न करु पाहणारी आहे. स्त्री पुरुषांची एकमेकांना गरज असते. प्रत्येक वळणावर, सुखाच्या ओल्या किंवा दु:खाच्या सुक्या क्षणीही. या जाणीवेने ती समर्थ, सक्षम नाही म्हणून नाही. किंवा अर्थाजनासाठीही नाही केवळ. तसेच केवळ शारीरिक भुकेसाठीही वाटत नाही. कारण तसे असते तर ती नायिका अगदी ऐन तारुण्यातलीही नाही. तर ती चाळीशी ओलांडलेली आहे. हे लक्षात येते. ती लाचार, दुबळी किंवा अगतिकतेने कुणा पुरुषापुढे नतमस्तक होत नाही. तर सहप्रवासी म्हणून, जीवनरस्ता एकट्याने काटते. विचारपूर्वक, बुध्दिचे ऐकून केवळ भावनेच्या बळावर नव्हे, जसपालशी लग्न करण्याचे ठरवते. येथे ती स्त्रीवाद जपते. ती केवळ शरीर जिवंत ठेवण्यापेक्षा स्वत:चे विचार, मन, आत्मसन्मानही जिवंत ठेवून जगणे आवश्यक मानते.

गौरीताईंच्या या कादंबरीतील नायिका फक्त स्वत:पुरते स्त्रीवादाचे गोडवे गात आहेत असे दिसत नाही. स्त्रीवाद हा सर्वच स्त्रीजातीसाठी विचार करायला लावणारी संकल्पना आहे, हे ती नायिका निदर्शनास आणून देते. त्यांच्या वावरात काम करणारा युवराज व त्याची पत्नी अंजना यांचा संसार सुरु होऊन चार-पाच वर्षे झालेली असतात. त्यांना अजून मूल नसते. याकारणावरुन अंजनाला माहेरी पाठवून युवराज दुसरी सोयरीक करणार असतो. हे जेव्हा वसुमतीला समजते तेव्हा तिची अवस्था रागाच्या पलिकडे वैफल्यग्रस्त होते. साऱ्यांनाच हे माहित असते. इतर जण कणव व्यक्त करुन फारतर गप्प असतात. पण वसुमती मात्र फक्त भावना व्यक्त करुन गप्प बसत नाही. त्याच्यापुढे जाऊन त्या भावना कृतीत उतरवते व तिला न्याय देण्याचा आपल्या परीने प्रयत्न करते. मूल नाही म्हणून तिला सोडून देणे हा तिच्यावर अन्यायच झालेला असतो. तेव्हा ती म्हणते, ''मूल होत नाही म्हणून सोडून द्यायला अंजना काय गोठ्यातील गाय आहे का ?'' पशूपेक्षा ती वेगळी आहे म्हणजे ती माणूस आहे हेच तिला सांगायचे असते. आपल्या घरी तिला घेऊन येते. त्यातही तिची कुठे उपकाराची दृष्टी किंवा दयेची भीक नसते तर माणूस म्हणून दाखवलेली माणुसकी असते, एवढेच.

त्याला मूल होत नसतं तर ती त्याला सोडून गेली असती का ? समाजाने तरी ते मान्य केले असते का? मग स्त्री बाबतच हा आपपर भाव समाज का चालवून घेतो ? या विचारानेच ही नायिका समाजाचे

कमी व स्वतःच्या मनाचे जास्त ऐकत असते असे वाटते. दोघांपैकी कुणा एकाला मूल होत नसेल तर एखादे परके मूल स्वीकारुन ते दोघांचे समजून वाढवता येते. हा मध्य साधणे संपूर्णपणे आपल्या समाजाला अजून जमत नाही. हीच या नायिकेची खंत आहे.

'गोफ' या कादंबरीतील अजून ठळक व्यक्तिचित्र म्हणजे 'मां'. त्यांच्या अनेक भूमिका पार पाडून झाल्या आहेत. भूमिका वटवताना स्त्री म्हणून मां ही परिस्थितीपुढे, कुठेही हतबल झालेल्या दिसल्या नाहीत. उलट येणाऱ्या प्रसंगांना धीराने सामोरे गेलेल्या दिसतात.

अगदी अल्पवयात वैधव्य आलं, त्या अनुषंगाने भाऊबंदकीचे चटके त्यांनाही चुकले नाहीत. दिरा कडून स्वतःची इस्टेट ताब्यात घेताना प्रसंगी त्यांनी कोर्टाची पायरीही चढली. एकुलत्याएक मुलाचा मृत्यू त्यांच्या वृध्द डोळ्यांना पहावा लागला. तेव्हाही त्या न खचता सुनेसाठी, नातवासाठी परत ताठ उभ्या राहतात. म्हणजे तारुण्यात जोडीदाराची सोबत निसटली तरी किंवा म्हातारपणाची काठी म्हणतो तो मुलगा, ही दोन्हीही माणसे त्यांना लाभली नाहीत. तरीही त्या असहाय्य होऊन, अगतिक झालेल्या दिसत नाहीत. शेत–वावर, गुरे–जनावरे, सून–नातू यांच्या समवेत जीवनाचा प्रवास सुरु ठेवताना दिसतात. इतर काही स्त्रियांप्रमाणे, स्वतःच्या नशीबाला दोष देत व स्वतःकडेही दुर्लक्ष करीत नाहीत. तसेच उगीचच देवाच्या नावानेही खडे फोडताना दिसत नाहीत. यातून एवढे दिसते की, स्त्री आहे म्हणून संकटांना, सामोरे जाताना भीती बाळगून चालणार नाही किंवा दीन, लाचार जीवनही जगत राहणार नाही. तर जीवनात सुख–दुःखे असणारच आणि त्याप्रसंगी मन, बुध्दी व शरीर तिघांनाही जिवंत ठेवणे हा माझा धर्म आहे. कारण मी माणूस आहे. हेच त्यांचे जीवन बघितले की वाटते. त्यांचे हे जीवन, स्त्री जीवन, स्त्रीवादाला पोसणारे, पुरक असे आहे .

मां आपण सासू आहोत म्हणून सूनेवर कोणत्याही बाबतीत आपले मत लादण्याचा प्रयत्न करत नाहीत. तिच्या व्यक्तिस्वातंत्र्याला कुठेही तडा जाणार नाही याचीही काळजी घेताना दिसतात. चाळीशी ओलांडलेली, पदरी बारा–तेरा वर्षाचा मुलगा असलेली सून जसपालशी लग्न करायचे ठरवते. तेव्हा त्या तिला कसलाही विरोध न करता संमती देतात. उलट जसपालला मुलाच्या ठिकाणीच स्वीकारतात. येथे त्यांच्या मनाच्या मोठेपणा दिसतो. स्त्री म्हणून दुसऱ्या स्त्रीचे स्त्रीत्व त्यांनी जपल्याचे दिसते. स्त्री झाली म्हणून काय झाले ? कोणत्याही वयात तिला जोडीदाराची, तिचे कुटुंब सावरण्याची, त्याच्या पूर्णत्वाची आस का असू नये ? याचा विचार इथे त्यांनी केलेला दिसतो. यावरुन त्या वसुमतीकडे केवळ स्त्री म्हणून नव्हे तर व्यक्ती, माणूस म्हणून बघताना दिसतात. मां ची व्यक्तिरेखा सोशिक आहे. हे सोसणे दुबळेपणाचे नाही. अबला म्हणून नव्हे तर सबला म्हणून ही व्यक्तिरेखा प्रभावी ठरते.

सुरवातीला जेव्हा मुलाने, सुलक्षणने न सांगता तेही आंतरजातीय विवाह केला, तेव्हा ही मां मुलाशी 'आपला तो बाब्या' या नात्याने मुलाला काही न म्हणता सुनेला दोष देऊन तिच्याशी सवतीच्या कार्ट्यासारखे वागत नाहीत. यावरुन मुलगा किंवा सून दोघांनाही एकाच भावनेने स्वीकारतात.

वसुमती ही उच्चशिक्षित, विचारी स्त्री आहे. तिने स्वत:च्या मनाप्रमाणे, घरच्यांचा विरोध स्वीकारुन सुलक्षणशी विवाह केलेला असतो. पती निधनानंतर जसपालशी लग्न करण्याचा निर्णय ही तिने स्वविचारानेच घेतलेला असतो. अगतिकतेतून नव्हे. पण व्यक्ती म्हणून ती स्वत:चे निर्णय घेत असते. तिथे स्त्री–पुरुष हा भेद गळून पडतो. तिचे सारे जीवन हे मुक्त विचारांचे असले तरी त्या मुक्ततेत इतरांच्या अस्तित्वाचे भान व जबाबदारीची जाणीव ही असते. गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्री मुक्त आहे. स्वतंत्र विचाराची आहे. परंतु कर्तव्यभावनेतून व मानवतावादातून ती मुक्त नाही. अशा प्रकारे गौरी देशपांडे यांच्या गोफ कादंबरीत दोन्ही स्त्री पात्रे स्त्रीत्वाचा सन्मान राखत स्त्रीवाद जपताना दिसतात.

**सारांश**

गौरी देशपांडे यांनी स्त्री जीवनाकडे पाहण्याची आपली दृष्टी उदार म्हणण्यापेक्षा 'माणूस' म्हणूनच ठेवली आहे आणि बदलणा–या काळानुसार–समाजानुसार या स्त्रीचे चित्रण केले आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबरीतील स्त्री 'अत्याधुनिक' दिसते. ती आचार–विचाराने ती 'पोषाखी' नाही. तिला 'सोयीचे' वाटणारे वस्त्र प्रावरण ती वापरते. ती पुरूषांची 'कॉपी' करीत नाही. तसेच त्याला शत्रू मानत नाही. त्याला ती 'माणूस' मानते. 'मित्र' मानते. 'गोफ'कादंबरीच्या अंतरंगात शिरताना गौरी देशपांडे यांच्या या वैशिष्ट्यांच्या खुणा आपणास आढळतात.

१९९१ मध्ये प्रसिध्द झालेल्या कादंबरीची नायिका चिडखोर, स्पष्टवक्ती, हट्टी व मुक्त विचारसरणीची आहे. या कादंबरीच्या कथानकात सासू–सून या नात्यातून भिन्न विचार, भिन्न स्वभाव यातून निर्माण झालेला संघर्ष आलेला आहे. घटना–प्रसंग–संवादातून तो स्पष्ट होतो. या कादंबरीत पात्रसंख्या मोजकी आहे. कथानकाचा पसारा नाही. छोटेखानी कादंबरी असल्याने सुसूत्रता आणि कथानकाची बांधणी आटोपशीर आहे. कथानकाचा आशय वेगळा व स्वतंत्र आहे. कादंबरीची नायिका वसुमती सुशिक्षित व सुखवस्तु कुटुंबातील असून स्वतंत्र विचारसरणीची आहे. स्वत:च्या मताशी प्रामाणिक असणारी ही स्त्री स्वार्थी नसून व्यवहार्य बाजू पाहणारी म्हणजे संबंधित व्यक्तीचे हित पाहणारी आहे. त्यामुळे भावविवशता या व्यक्तिमत्वात नाही. बुध्दिप्रामाण्याने ती प्रसंग आणि व्यक्तिकडे पाहणारी असून आपले व दुस–यांचे 'माणूसपण' जपण्याचा प्रयत्न करणारी आहे. स्वत: आत्मभान ठेवणारी इतरांचे जागे करण्याचा प्रयत्न

करणारी. तरीही कोडे न सुटणारी अशी आहे. त्यामुळे या कादंबरीचा आशय व्यक्तिरेखेच्या अंगाने विकसित झालेला दिसतो आणि त्यातून लेखिकेला अभिप्रेत असणारा 'स्त्रीवाद' स्पष्ट होत नाही. या कादंबरीच्या सोप्या ओघवत्या भाषाशैलीतून व्यक्तिरेखा, प्रसंग, संघर्ष स्पष्ट होत गेल्याने कादंबरीचा एकूण प्रभाव चांगला पडलेला आहे. नात्याचा, प्रसंगांचा आणि जुन्या-नव्या विचारांचा व जीवनशैलीचा 'गोफ' या कादंबरीत प्रभावी झालेला आहे. यानंतरच्या प्रकरणात आपणास 'उत्खनन' कादंबरीच्या अंतरंगाचा स्त्रीवादाच्या अंगाने वाङ्मयीन शोध घ्यावयाचा आहे.

# संदर्भ सूची

१) विद्याधर दशपुत्रे, 'मिळून साऱ्याजणी', गौरी देशपांडे विशेषांक २००३ ऑगस्ट, मौज प्रकाशन, पुणे, पृ. ९५.

२) विजया राजाध्यक्ष, 'मिळून साऱ्याजणी', गौरी देशपांडे विशेषांक २००३ ऑगस्ट, मौज प्रकाशन, पुणे, पृ.१२६.

३) डॉ. अश्विनी धोंगडे,'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, प्रथमावृत्ती, ३१ जानेवारी, १९९३, पृ. २०.

४) डॉ. मंगला वरखेडे, 'स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन', का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे – २, प्रथमावृत्ती, १ जाने. १९९९, पृ. २.